# शाळांचा भौतिक विकास

## महात्मा गांधी रोजगार हमी योजनेतून



महाराष्ट्रातील प्रत्येक वाडी आणि वस्तीपर्यंत मुलांच्या शिक्षणासाठी जिल्हा परिषद शाळांचा विस्तार झाला आहे. महाराष्ट्रातील बहुतांशी विद्यार्थी जिल्हा परिषद शाळांतून शिक्षण घेत आहेत. या सर्व मुलांना दर्जेदार शिक्षण आणि शालेय सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन स्तरावर वेळोवेळी विविध उपाय योजना केल्या जातात. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारेही शालेय बाबींची पूर्तता करण्यासाठी आर्थिक तरतूद जिल्हा नियोजन मंडळ, वित्त आयोग निधी इ. मार्फत केली जाते. या सर्वांच्या सोबतच शाळांच्या गरजा पूर्ततेसाठी महाराष्ट्र शासनाद्वारे महात्मा गांधी रोजगार हमी योजनेच्या (मनरेगा) माध्यमातून शाळांचा परिसर सुंदर आणि संसाधनयुक्त करण्याचा मार्ग सर्व ग्रामपंचायतीना उपलब्ध करून दिला आहे.

### 'जैतादेही पॅटर्न'

शाळांचा परिसर महात्मा गांधी रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून सुंदर बनवणे शक्य आहे. याबाबतचे नियोजन अमरावती जिल्ह्यातील चिखलदरा तालुक्यातील जैतादेही गावच्या जिल्हा परिषद शाळेमध्ये गटविकास अधिकारी, चिखलदरा पंचायत समिती आणि जैतादेही शाळेच्या शिक्षकांनी केले आहेत. 'जैतादेही पॅटर्न' च्या धर्तीवर मनरेगा योजनेच्या माध्यमातून राज्यातील इतरही शाळांचा भौतिक विकास करणे शक्य आहे.

शासन परिपत्रक क्र. म ग्रा रो-२०२०/प्र. क्र. ७५/रोहयो-७ दिनांक:०१ डिसेंबर, २०२०

जिल्हा परिषद शाळा आणि अंगणवाड्यांच्या भौतिक विकासासाठी मग्रारोहयो अंतर्गत घेता येणारी कामे :

१. शाळेसाठी किचन शेड
२. शाळा/ अंगणवाडीच्या इमारतीसाठी रेन वॉटर हारवेस्टींग संरचना

३. शाळा/ अंगणवाडीच्या परिसरात शोषखड्डा
४. शाळा / अंगणवाडीसाठी (multi-unit ) शौचालय
५. शाळा/ अंगणवाडीसाठी खेळाचे मैदान
६. शाळा/ अंगणवाडीला संरक्षक भिंत (wall compound)
७. वृक्ष लागवड (बिहार पॅटर्न)
८. आवश्यकतेनुसार शाळा/ अंगणवाडीच्या परिसरात पेविंग ब्लॉक
९. शाळा/ अंगणवाडीच्या परिसरात/ बाहेर काँक्रीट नाली बांधकाम
१०. शाळा / अंगणवाडीकडे येणारे रस्ते गुणवत्तापूर्ण करणे
११. बोअरवेल पुनर्भरण (शाळा/ अंगणवाडीत बोअरवेल असल्यास)
१२. गांडूळ खत प्रकल्प
१३. नाडेप कंपोस्ट

यातून पुढील गोष्टी साध्य होतील...

- गावातील लोकांना गावामध्ये रोजगार उपलब्ध होईल.
- गावामध्ये विकासाच्या शाश्वत मालमत्ता तयार होतील.
- शालेय परिसर स्वच्छ, सुंदर आणि रमणीय बनेल.
- शालेय सोयी सुविधांची पूर्तता होईल.
- शालेय परिसरात वृक्ष लागवडीद्वारे मुलांना पोषक फळे उपलब्ध होतील.
- शालेय जीवनात मुलांना गांडूळ खत निर्मिती अनुभवाद्वारे सेंद्रिय शेतीचे महत्व आणि प्रसार होईल.

## उद्देश

१. अकुशल मजुरी रोजगार उपलब्ध होईल.

२. गावात शाश्वत मालमत्ता तयार होईल.

## कुशल/अकुशल प्रमाण

अकुशल कुशल हे प्रमाण ६०:४० असावे. अकुशल खर्च जितका जास्त असेल तितका कुशल खर्चास जास्त वाव मिळतो.

## मनरेगा मधून काम मागणीचे टप्पे

**शाळा स्तर**

- गरजा निश्चिती
- SMC ठरावाद्वारे आवश्यक कामांची मागणी ग्रामपंचायतीला सादर करणे.

**ग्रामपंचायत स्तर**

- प्राप्त मागणीद्वारे कामांचा समावेश नरेगा कृती आराखड्यात करणे.
- आवश्यक कागदपत्रे जोडून प्रस्ताव पंचायत समितीला सादर करणे.

**केंद्र स्तर**

- केंद्रप्रमुख यांचे द्वारे सर्व शाळांचे मागणीपत्र ग्रामपंचायतीला सादर केलेबाबतचा आढावा घेणे.
- शाळा आणि ग्रामपंचायत स्तरावर समन्वयासाठी प्रयत्न करणे.

gyan prakash FOUNDATION

ग्यानप्रकाश फाउंडेशन

३०२, 'ऑर्चर्ड'डॉ.पै.मार्ग, बाणेर, पुणे-४५
इमेल-admin@gyanprakash.org